दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे     सहसंपादक : तुकाराम कामठे

या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.
- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स

संपर्क: 75-59-26-16-75

वर्ष ५ । अंक १९८ । मंगळवार २८ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322

## प्रमोद कुलकर्णी यांच्या हत्येचा प्रयत्न करणाऱ्या कृष्णा खैरेसह दोघे पोलिसांसमोर हजर

**। न्यायालयाने आरोपींना दिली २९ पर्यंत पोलिस कोठडी**
**। गुंड प्रवृत्तीचा दिपक खैरे हा अद्यापही फरार**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रसिध्द व्यापारी प्रमोद कुलकणी यांच्या खूनाचा प्रयत्न करणारे कृष्णा दिपक खैरेसह दोघे पोलिसांना शरण (हजर ) आले आहे. तर मुख्य आरोपी गुंड प्रवृत्तीचा दिपक खैरे हा अद्यापही फरार आहे.

महापालिकेत तक्रार अर्ज केल्याच्या रागातून दिपक खैरें, कृष्णा खैरे यांच्यासह चौघांनी रेल्वेब्रिजजवळ प्रसिध्द व्यापारी प्रमोद कुलकर्णी यांना दि. ६ एप्रिल रोजी लाकडी दांडक्याने जबर मारहाण करण्यात आली होती. त्यामध्ये कुलकर्णी हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी पुणे येथे खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले होते. तेथे त्यांच्या दोन्ही पायांवर शस्त्रक्रीया करण्यात आली .

कुलकर्णी यांना मारहाण करण्यात आल्याच्या घटनेपासून दिपक खैरेसह गुन्ह्यातील आरोपी हे फरार झाले होते. या गुन्ह्यातील आरोपी कृष्णा खैरे व कुर महादेव सोनवणे हे दोघे पोलिसांसमोर हजर झाल्यावर त्यांना न्यायालयासमोर हजर करण्यात आले. गुन्ह्यातील हत्यारे जप्त करणे आवश्यक असून अन्य आरोपींना शोध घ्याचा असल्याने न्यायालयाने आरोपींना २९ एप्रिल पर्यंत पोलिस कोठडी ठेवण्याचे आदेश दिले आहे.

### गुंड प्रवृतीचा दिपक खैरे अद्यापही फरर

**माजी नगरसेविकेचा पती असलेला हा गुंड प्रवृतीचा आरोपी दिपक खैरे हा घटनेनंतर फरार झाला. त्याचा पोलिस शोध घेत असून पोलिस लवकरच त्याच्या मुस्क्या आवळल्या शिवाय राहणार नाही हे निश्चित.**

## विवेक कोल्हेंच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब?

**फडणवीस–कोल्हे भेटीने राजकीय घडामोडींना वेग । भाजपच्या अंतिम यादीपूर्वीच हालचाली तीव्र । नव्या चेहऱ्यांना संधी देण्याच्या रणनीतीत कोल्हे आघाडीवर**

**मुंबई । वृत्तसंस्था**

आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संभाव्य उमेदवार म्हणून चर्चेत असलेले विवेक कोल्हे यांनी सोमवारी उशिरा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतलेली भेट राज्याच्या राजकारणात चर्चेचा केंद्रबिंदू ठरली आहे. या भेटीबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नसली, तरी ती पूर्णपणे राजकीय संदर्भात असल्याचे मानले जात आहे. भाजपची विधान परिषद उमेदवारांची यादी जाहीर होण्याच्या अगदी तोंडावर ही भेट झाल्यामुळे, कोल्हे यांच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब होण्याच्या शक्यतांना बळ मिळत असल्याचे राजकीय निरीक्षकांचे म्हणणे आहे.

**बावनकुळे यांचे सूचक वक्तव्य**

गेल्या काही दिवसांपासून भाजपच्या वर्तुळात विधान परिषदेसाठी विवेक कोल्हे यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू



आहे. त्यातच राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दोन दिवसांपूर्वी केलेल्या सूचक विधानामुळे या चर्चांना अधिकच बळ मिळाले. बावनकुळे यांनी कोल्हे यांच्याबाबत सकारात्मक संकेत देणारे वक्तव्य केल्याचे बोलले जाते. त्यामुळे फडणवीस–कोल्हे भेट ही केवळ औपचारिक नसून, उमेदवारीच्या अंतिम टप्प्यातील चर्चेचा भाग असल्याचे मानले जात आहे.

**कोल्हे कुटुंबाचा प्रभाव आणि स्थानिक राजकारण**

नगर जिल्ह्यात कोल्हे कुटुंबाचे राजकीय वर्चस्व दीर्घकाळापासून आहे. विवेक कोल्हे हे ज्येष्ठ नेते शंकरराव कोल्हे यांचे नातू असून, माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांचे सुपुत्र आहेत. कोपरगाव मतदारसंघात 'काळे–कोल्हे' असा राजकीय संघर्ष अनेक वर्षांपासून पाहायला मिळतो. विधानसभा निवडणुकीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसने आशुतोष काळे यांना उमेदवारी दिल्यानंतर महायुतीच्या राजकारणात समन्वय राखण्याचे आव्हान उभे राहिले होते. त्या वेळी भाजपने कोल्हे यांना संयम राखण्याचे निर्देश दिले होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांची थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी भेट घडवून आणत त्यांना दिलासा दिला होता.

**भाजपची रणनीती**

यंदाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपने धोरणात्मक ■ पान ४ वर

## एसटी महामंडळा मार्फत सवलतीच्या 'डिजिटल कार्ड' वाटप सुरू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एसटी महामंडळा मार्फत जेष्ठ नागरिक, महिला,आणि दिव्यांग व्यक्तींना प्रवासात सवलती करिता स्मार्ट कार्ड चे वाटप सुरु करण्यात आले आहेत. एनसीएमसी स्मार्ट कार्ड म्हणजे जे कार्ड तुम्हाला मेट्रो बस इतर ठिकाणी अखंड प्रवासाची सुविधा देते.मार्च अखेर पर्यंत ४० हजारापेक्षा जास्त नागरिकांनी नोंदणी केली असून,काही तयार झालेल्या कार्डचे वाटप प्रत्येक शनिवारी तारकपूर येथे करण्यात येत असल्याची माहिती श्री.अथर खान यांनी दिली.

वरिष्ठ वाहतूक निरीक्षक श्री.किरण शिंदे यांचे हस्ते आज जेष्ठ नागरिक यांना स्मार्ट कार्ड वाटप प्रातिनिधिक स्वरूपात




करण्यात आले . त्यावेळी जेष्ठ नागरिक श्री.रफिक मुन्शी यांनी सांगितले कि नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा महामंडळाने करणे ■ पान ४ वर

## नेवाशात गोमांस विक्रीवर पोलिसांचा छापा; दोन आरोपी जेरबंद, ४८ हजारांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** नेवासा खुर्द येथील नाईकवाडी कुरेशी मोहल्ला भागात छुप्या पद्धतीने सुरू असलेल्या गोमांस विक्रीवर नेवासा पोलिसांनी मंगळवारी (दि. २८) सकाळी दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले असून, सुमारे १५५ किलो गोमांस आणि इतर साहित्य असा एकूण ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नेवासा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांना मिळालेल्या माहितीनुसार नेवासा खुर्द येथील नाईकवाडी कुरेशी मोहल्ल्यात गोमांसाची विक्री होत आहे. माहिती



मिळताच ढिकले यांनी तात्काळ पथक तयार करून कारवाईचे आदेश दिले.

दोन ठिकाणी एकामागून एक कारवाई

पहिली कारवाई: पोलीस पथकाने सकाळी ८:३० च्या सुमारास नाईकवाडी मोहल्ल्यात छापा टाकला. तेथे अरबाज अबू चौधरी (वय २९) हा इसम गोमांस तोडून विक्री करताना रंगेहात सापडला. पोलिसांनी त्याला जागीच ताब्यात घेतले.

दुसरी कारवाई: पहिल्या कारवाईदरम्यान पोलिसांना माहिती मिळाली की, शेजारीच राहणाऱ्या आयाज शेख याच्या घराच्या वरच्या मजल्यावरही मांस ■ पान ४ वर

**भिस्तबाग चौकात**

## गॅस रिफिलींग सेंटरवर छाप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पाईपलाईनरोड परिसरात घरगुती गॅस टाक्यांतील गॅस वाहनांमध्ये रिफिलींग करणाऱ्या सेंटरवर छापा टाकून एलसीबीने कारवाई केली आहे.

सचिन अशोक भांड (वय, ३६ रा. शिमला कॉलनी, भिस्तबाग रोड, अहिल्यानगर) अशी कारवाई करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून १० हजार रुपये किमतलीचा एक सिल्व्हर रंगाची इलेक्ट्रीक मोटार, त्यास गॅस रिफलींगद्वारे लागणारे घरगुती गॅसची टाकी असा ऐवज जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई ही पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार सुनिल पवार, गणेश धोत्रे, शाहिद शेख, सोनल भागवत यांनी केली.

## शंभर वर्षाच्या संघ वाटचालीमुळे भारत मातेला परमोच्च वैभव प्राप्त होऊन भारत हा विश्व गुरु होईल – विवेक कुलकर्णी

**भिंगार येथे विराट हिंदू संमेलनात उस्फूर्त प्रतिसाद**






**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथे हिंदूत्व संपवण्यासाठी आलेला औरंगजेबाला भिंगारकरांनी याच भूमीत गाडले आहे.हिंदू सनातन आहेत,हिंदू संस्कृती व परंपरेवर हजारो वर्षापासून आक्रमणे झाली तरीदेखील हिंदू संस्कृती टिकली आहे.हिंदुचा स्वाभिमान कमी होत आहे.तेव्हा हिंदूचा स्वाभिमान व शक्ती जागृत करण्यासाठी १९२५ साली पूजनीय डॉ.केशव हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली.संघाचे संघटन कार्य पाहून जग म्हणते आम्हाला आत्म भावनेने संघटित व्हायचे असेल. तर संघा सारखे संघटन कौशल्य आम्हाला हवे आहे. असे संपूर्ण जगाला वाटत आहे.

जगामध्ये विवांचना आहे,युद्ध आहे,आक्रमकता आहे परंतु भारतात प्रभू श्रीरामाचे भव्य मंदिर आहे.बाबरी चा ढाचा गीता जयंतीला पडला.ढाचा पडल्यानंतर देशात त्याचे तीन प्रमुख परिणाम झाले. हिंदू समाज जातीपातीत विभागला होता तो समरस झाला धार्मिकदृष्ट्या हिंदू कट्टर झाला राजकीय दृष्ट्या हिंदू जागृत झाला.

१९९२ पूर्वी देशात मुस्लिम वोट बँक होती परंतु ९२ सालाच्या बॉम्बस्फोट नंतर देशात राजकीय पक्षाला हिंदू समाजामध्ये काय चाललंय याचा विचार करावा लागला आहे.

विश्व पटलावर हिंदूंच्या समस्या कोण मांडेल?विश्वामध्ये हिंदूंना एकत्र कोण करेल?वनवासी समाजाच्या समस्या,हिंदू माता भगिनींच्या समस्या कोण मांडणार ? सर्व हिंदू समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी साधुसंतांना एकत्र करून संतांच्या आदेशानुसार विश्व हिंदू परिषदेची स्थापना करण्यात आली.तसेच कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी भारतीय मजदूर संघाची स्थापना करण्यात आली.संघाची १०० वर्षाची वाटचाल काय आहे? हे समजून घेण्यासाठी विराट हिंदू संमेलन देशभर होत आहेत.

१९४७ साली भारताची पाहणी होईल असे कोणालाही वाटले नव्हते.तरी पाकिस्तान हा धर्माच्या नावाखाली वेगळा झालाच.नेपाळ,बांग्लादेश, श्रीलंका,इराक,इराण यांचे आज जरी काही वेगळे चालले असले तरी ईश्वराच्या,विधी व नियतीच्या नूसार २०४७ साली अखंड भारत निर्माण होईल. अशी वाटचाल भारत देशात सुरू आहे.शंभर वर्षाच्या संघ वाटचालीमुळे भारत मातेला परमोच्च वैभव प्राप्त होऊन भारत हा विश्व गुरु होईल.असे प्रतिपादन अखिल भारतीय बजरंग दलाचे सहसंयोजक विवेक कुलकर्णी यांनी केले आहे.

भिंगार येथील श्री शुक्लेश्वर महादेव मंदिर येथे विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.भिंगार येथील प्राचीन मारुती मंदिरापासून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.या शोभायात्रेत या मिरवणुकीत हिंदू समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.या शोभायात्रेचा समारोप श्री शुक्लेश्वर महादेव मंदिर येथे करण्यात आला.यानंतर विराट हिंदू संमेलनाचे प्रखर हिंदुत्ववादी वक्ते बजरंग दलाचे अखिल भारतीय सहसंयोजक विवेक कुलकर्णी,मेहेकरी येथील संजीवनी गडाचे महंत शंकर भारती महाराज,आळंदी येथील युवा प्रवचनकार हभप महादेव महाराज घोडके,पुणे येथील हिंदुत्ववादी कार्यकर्ते सर्वेश मेहंदळे आदींनी सभेला उद्बोधन केले.याप्रसंगी हिंदू समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

युवा प्रवचनकार हभप महादेव महाराज घोडके म्हणाले,टिपू सुलतान व आलमगिर चे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न या देशात होत असेल तर छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे दैवत आहे.हे सांगण्याचा आम्हाला गर्व वाटत आहे. छत्रपती संभाजी महाराज यांनी धर्मासाठी दिलेले ■ पान ४ वर



अहिल्यानगर शहरातील तापमान ४० अंशांपर्यंत वाढ झाल्याने कुत्र्यांनी सरकारी कार्यालयात आश्रय घेतल्याचे दिसत आहेत. (छाया – जाकीर शेख)

## बिडकीनमध्ये दोन तरुणांचा संशयास्पद मृत्यू; विष प्राशनाची शक्यता

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील बिडकीन येथील दोन तरुणांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी उघडकीस आली. विष प्राशन केल्याने मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, याप्रकरणी बिडकीन पोलीस ठाण्यात अमृ (क्रमांक ४२/२०२६) दाखल करण्यात आला आहे.

माहितीनुसार, गणेश काकासाहेब झिरपे (वय २३, रा. सूर्य उद्योग नगर, बिडकीन, ता. पैठण) व सचिन भगीरथ आरगडे (वय २९, रा. धनगर पिंपरी, ता. शेवगाव, जि. जालना) यांना त्यांच्या नातेवाईकांनी मंगळवारी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास बिडकीन येथील ग्रामीण रुग्णालयात मृतावस्थेत आणले.

रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केली असता दोघांचा मृत्यू झाल्याचे



निष्पन्न झाले. विष प्राशनामुळे मृत्यू झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. यासंदर्भात एमएलसी क्रमांक १३३ व १३४ नोंदविण्यात आले आहेत.

या प्रकरणी दुपारी २.२३ वाजता अमृ नोंद करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक खुळे करीत आहेत. मृत्यूचे नेमके कारण पोस्टमार्टम अहवालानंतर स्पष्ट होणार आहे.

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरमध्ये प्रथमच एआय कोर्स!

अहिल्यानगर- शहरातील विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी एक मोठी आणि आनंदाची बातमी. भविष्यातील तंत्रज्ञानाचे आव्हान पेलण्यासाठी आणि करिअरला नवी दिशा देण्यासाठी श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन घेऊन आले आहे.हा विशेष १५ दिवसांचा मास्टरक्लास! श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन च्या विद्यार्थ्यांची मोठी झेप!नुकताच २० ते २५ एप्रिल दरम्यान पार पडलेल्या बॅचमध्ये ६ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांनी हा कोर्स केवळ पूर्णच केला नाही, तर स्किल इंडियाकडून ए आय फॉर ऑलचे अधिकृत प्रमाणपत्र सुद्धा मिळवले आहे. शालेय वयातच एआयवर पकड मिळवल्यामुळे पालकांमध्येही समाधानाचे वातावरण आहे. काय आहे ही सुवर्णसंधी पुढील नवीन बॅच , ४ मे पासून सकाळी ९:३० वाजता सुरू होत आहे. डिजिटल मार्केटिंग क्षेत्रातील अहिल्यानगर मधील एक्सपर्ट प्रा. प्रकाश सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कोर्स चालणार आहे. यामध्ये खालील महत्त्वाचे विषय कव्हर केले जातील: या कोर्स मध्ये एआयची संपूर्ण ओळख- एआयला नेमक्या सूचना देऊन काम करून घेण्याची कला.केवळ एका कमांडवर प्रतिमा आणि व्हिडिओ तयार करणे.व्यावसायिक आणि विद्यार्थ्यांसाठी डेटाचा प्रभावी वापर.व्यावसायिकांसाठी गेम चेंजर: हा कोर्स केवळ विद्यार्थ्यांसाठीच नाही, तर आपला व्यवसाय ऑटोमेशनवर नेऊ इच्छिणाऱ्या व्यावसायिकांसाठी एक सुवर्णसंधी आहे. मार्केटिंगपासून ते डेटा मॅनेजमेंटपर्यंत एआय कसे वापरावे, याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण येथे दिले जाणार आहे.आजच आपले नाव नोंदवा! नवीन बॅचसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून जागा मर्यादित आहेत. एआयच्या या प्रवासात सामील होऊन आपले भविष्य सुरक्षित करण्यासाठी त्वरित संपर्क साधा. अधिक माहिती व फी संदर्भात संपर्क: ९८९०४७६२३७, ९९७०४ २३३३४ स्थळ: श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन, भवानी नगर, अहिल्यानगर.

### अहिल्यानगरात ज्योतिष विशारद सुधाकरपंत गारडे यांचे निधन



अहिल्यानगर - सावेडी रोड येथील आशीर्वाद बँक कॉलनी परिसरातील रहिवासी, नगर अर्बन बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी व प्रसिद्ध ज्योतिष विशारद कै. सुधाकरपंत गारडे (वय ८४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.

सुधाकरपंत गारडे हे वारकरी संप्रदायाचे निष्ठावंत अनुयायी होते. सालाबादप्रमाणे ते आपल्या गुरु हरिहर महाराज यांच्या पालखी सोहळ्यानिमित्त पंढरपूर यात्रेत नियमित सहभागी होत असत. हरिहर महाराज सेवा मंडळ तसेच सत्यसाई सेवा मंडळाच्या विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये ते सक्रिय सहभाग घेत, भजन व कीर्तनाद्वारे भक्तीभाव व्यक्त करत असत. नगर अर्बन बँकेतून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी ज्योतिष विशारद ही परीक्षा उत्तीर्ण करून अनेक समाजबांधवांना त्यांच्या आयुष्यातील समस्यांवर मार्गदर्शन व उपाय दिले. ते उत्कृष्ट रांगोळी कलाकार म्हणूनही परिचित होते. कायम उत्साही आणि समाजाभिमुख असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई आणि नातवंड असा मोठा परिवार आहे. पत्रकार साईराम सुधाकर गारडे व मोबाईल शॉपीचे संचालक हरिप्रसाद गारडे यांचे ते वडील होते. तसेच प्रशांत बिडकर यांचे सासरे, आणि महेश पतसंस्था अजय टकले व विनोद लड्डा यांचे ते व्याही होते. त्यांच्यावर भिंगार स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्काराला नातेवाईक, समाजबांधव तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी वीरशैव पट्टशाली लिंगायत कोष्टी समाज भिंगार कार्यकारिणीच्या वतीने त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# ॲडव्हांसमेंट इन कॉंक्रिट विषयावर जिग्नेश गांधी यांचे मार्गदर्शन; तांत्रिक सेमिनारला उत्स्फूर्त प्रतिसाद

### आर्किटेक्ट-इंजिनीअर्सना आधुनिक कॉंक्रिट तंत्रज्ञानाची सखोल माहिती



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर आणि अदाणी सीमेन्ट यांच्या संयुक्त विद्यमाने ''ॲडव्हांसमेंट इन कॉंक्रिट'' या महत्त्वपूर्ण विषयावर तांत्रिक सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. या सेमिनारमध्ये अदानी सिमेंट महाराष्ट्र क्लस्टर टेक्निकल सर्व्हिस हेड जिग्नेश गांधी यांनी उपस्थित सभासदांना आधुनिक कॉंक्रिट तंत्रज्ञानाविषयी सखोल मार्गदर्शन केले.

या व्याख्यानामध्ये जिग्नेश गांधी यांनी सेल्फ कॉम्पॅक्शन कॉंक्रिट, प्रिकास्ट बांधकामासाठी वापरले जाणारे उच्च ग्रेड कॉंक्रिट, तसेच हाय परफॉर्मन्स कॉंक्रिट यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर माहिती दिली. आधुनिक बांधकाम क्षेत्रात टिकाऊपणा आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी योग्य प्रकारचे कॉंक्रिट निवडणे किती आवश्यक आहे, यावर त्यांनी विशेष भर दिला.

अदानी सिमेंट हे देशातील २८ राज्ये आणि ५५० जिल्ह्यांमध्ये कार्यरत असून देशाच्या नियोजित आणि दर्जेदार बांधणीमध्ये आर्किटेक्ट व इंजिनीअर्स यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कॉंक्रिट दीर्घकाळ टिकण्यासाठी संशोधनाधारित सिमेंटचा वापर आवश्यक असून, अदानी सिमेंटची रिसर्च टीम विविध वातावरणानुसार योग्य सिमेंट विकसित करत असल्याची माहिती त्यांनी दिली.

''कॉंक्रिट टॉक'' या उपक्रमाच्या माध्यमातून अदानी सिमेंट तांत्रिक क्षेत्रात जनजागृती करत असून, विविध तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून अभियंते व आर्किटेक्ट यांना अद्ययावत ज्ञान उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. जिग्नेश गांधी यांनी आतापर्यंत ४५० हून अधिक तांत्रिक सत्रे घेतली असून निवासी प्रकल्पांमध्ये तसेच स्पेशल कॉंक्रिट क्षेत्रात त्यांचा मोठा अनुभव आहे. ते मागील ३४ वर्षांपासून अंबुजा सिमेंटमध्ये कार्यरत आहेत.

संस्थेचे अध्यक्ष अभिजित देवी यांनी अदानी सिमेंटच्या तांत्रिक जनजागृती उपक्रमाचे कौतुक करत, या ज्ञानाचा वापर करून सभासद अधिक गुणवत्तापूर्ण व टिकाऊ बांधकाम करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यक्रमास अदानी सिमेंटचे रिजिनल सेल्स हेड विवेक भिडे, टेक्निकल रिजिनल हेड चंद्रशेखर निघोनकर, सुमित चौधरी तसेच सर्व्हिस इंजिनिअर अरविंद रोकडे, दिग्विजय देशमुख, संदीप खामकर, प्रीतेश गांजरे आणि अशोक आडेप उपस्थित होते. तसेच एसा उपाध्यक्ष प्रदीप तांदळे, सचिव भूषण पांडव, विवेक आपटे, अशोक मवाळ, सुनिल औटी, संतोष खांडेकर सचिन डागा, अनमोल जैन, संकेत पादिर, गौरव मांडगे, श्रेयस दरे, इक्बाल सय्यद यांच्यासह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगरचे राजेंद्र खिलारी यांना दिल्लीत आजीवन कार्यगौरव पुरस्कार प्रदान

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगरचे रहिवासी असलेले सध्या मुंबई उच्च न्यायालयात कक्ष अधिकारी म्हणून कार्यरत असलेले श्री.राजेंद्र एकनाथ खिलारी यांना त्यांच्या उल्लेखनीय सेवेसाठी आणि शैक्षणिक योगदानासाठी राष्ट्रीय पातळीवरील मानाचा ''शासकीय विधी प्रशासन क्षेत्रातील आजीवन विशेष कार्यगौरव (वरिष्ठ)'' हा प्रतिष्ठित पुरस्कार बहाल करण्यात आला आहे.

हा सन्मान सोहळा नुकताच दिल्ली येथे पार पडला. यावेळी राष्ट्रीय उत्कृष्टता पुरस्कार २०२६ या भव्य समारंभात प्रदान करण्यात आला. या सोहळ्यात एच.इ.म्मे इल्दजीमा बड्डा मल्लोट (चाड प्रजासत्ताकाच्या राजदूत), एच.इ.यानो एडेम एकपेमडो (टोगो प्रजासत्ताकाचे राजदूत) आणि श्री.मदन लाल (माजी भारतीय क्रिकेटपटू, १९८३ विश्वचषक विजेते) यांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार देण्यात आला, ही नगरकरांसाठी अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे.

श्री.राजेंद्र खिलारी यांनी आजपर्यंत एकूण ९ पदव्या व पदव्युत्तर पदव्या संपादन करून आपल्या शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय ठसा उमटवला आहे. तसेच मुंबई उच्च न्यायालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कल्याणासाठी त्यांच्या आरोग्यासाठी केलेले त्यांचे कार्यही विशेष कौतुकास्पद आहे. त्यांच्या निष्ठा, प्रामाणिकपणा आणि सातत्यपूर्ण उत्कृष्ट सेवेमुळेच त्यांना हा सर्वोच्च सन्मान प्राप्त झाला आहे.

त्यांच्या या यशामुळे केवळ मुंबई उच्च न्यायालयाचा नव्हे, तर संपूर्ण न्यायव्यवस्थेचा गौरव वाढला असून अनेकांना प्रेरणा मिळत आहे. लक्ष्मी नगर सोसायटीचे माजी अध्यक्ष एकनाथ खिल्लारी यांचे ते चिरंजीव असून संगमनेर तालुक्यातील कनोली गावातील एका सर्वसामान्य कुटुंबातून त्यांनी शैक्षणिक खडतर प्रवास केला. आज त्याचे फळ मिळाले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल नगरचे आमदार संग्राम जगताप, ऑल इंडिया हायकोर्ट कर्मचारी महासंघ, मुंबई उच्च न्यायालय कर्मचारी संघटना, लक्ष्मीनगर गृहनिर्माण संस्था चे सर्व पदाधिकारी, प्रभाग क्रमांक २ चे नगरसेवक निखिल वारे, महेश तवले, माजी नगरसेवक श्री.सुनील त्र्यंबके, बाळासाहेब पवार, तसेच न्यू आर्ट्स कॉलेज नगर येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, नगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटना, छत्रपती ट्रस्ट तसेच बी.कॉम १९९७ बॅचच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. आहे.

अहिल्यानगर येथील त्यांचा खुप मोठा मित्र परिवार आहे.या परिवाराच्या वतीने श्री.राजेंद्र खिलारी यांना पुढील वाटचालीसाठी अधिक यश, कीर्ती आणि उत्तुंग कामगिरीच्या शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# नितीन शिरसाठ हत्याकांडातील आरोपींना अटक करा

### महिलांचे जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण




**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नितीन शिरसाठ यांच्या निर्घृण खुनातील आरोपींना तात्काळ अटक करावी व त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी शिरसाठ कुटुंबीयांसह गावातील महिलांनी सोमवारी (दि. २७ एप्रिल) जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण केले. या आंदोलनात महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. या उपोषणात स्वाती नितीन शिरसाठ, शारदा शिरसाठ, स्वाती शिरसाठ, आशा आल्हाट, उषा शिरसाठ, वंदना शिरसाठ, तेरेसा शिरसाठ, वैशाली मगर, नंदा साळवे, शिवबा साळवे, रोहिणी गायकवाड, पल्लवी हिवाळे, सविता शिरसाठ यांसह अनेक महिला सहभागी झाल्या होत्या.

दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी घोडेश्वरी हॉस्पिटल, घोडेगाव (ता. नेवासा) येथे नितीन शिरसाठ यांची भरदिवसा गोळ्या झाडून निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेला तब्बल ७० ते ८० दिवस उलटूनही आरोपी अद्याप पोलिसांच्या ताब्यात आलेले नाहीत. मृत नितीन शिरसाठ यांच्या पत्नीने अत्यंत भावनिक शब्दांत आपली व्यथा मांडताना सांगितले की, ''मी त्या घटनेच्या वेळी घटनास्थळी उपस्थित होते. आमची ३ महिन्यांची मुलगी आहे व आणखी पाच लहान मुले आहेत. आरोपी अजूनही मोकाट असल्याने आमच्या कुटुंबावर केव्हाही हल्ला होऊ शकतो. आम्हाला सतत भीतीच्या छायेत जगावे लागत आहे.'' तसेच, आरोपींना कोणीतरी पाठीशी घालत असल्याचा संशय व्यक्त करत, ''पोलीस प्रशासनावर नेमका कोणाचा दबाव आहे?'' असा सवालही कुटुंबीयांनी उपस्थित केला.

सदर प्रकरणातील आरोपी हे 'फुलमाळी टोळी'शी संबंधित असल्याचे सांगण्यात येत आहे. या टोळीवर यापूर्वीही अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती असून, पोलीस प्रशासनाला याची पूर्ण कल्पना असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. तरीही त्यांच्यावर कठोर कारवाई का होत नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. ही टोळी संघटित पद्धतीने गुन्हे करत असल्याने त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई होणे अत्यावश्यक आहे. केवळ आश्वासन देऊन वेळकाढूपणा करण्याऐवजी पोलिसांनी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी उपोषणकर्त्या महिलांनी व्यक्त केली.

नितीन शिरसाठ हत्याकांडातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात आली नाही, तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशाराही शिरसाठ कुटुंबीय व महिलांनी दिला आहे.

### कार्यालयांमध्ये 'गोपुजन' अनिवार्य करावे

# गोमाता रक्षण संघटनेचा मोर्चा




**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पैठण–** दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पैठण शहरात पैठण तालुका गोमाता रक्षण संघटनेच्या वतीने सोमवारी (दि. २७) 'गोमाता संरक्षण जागर मोर्चा' उत्साहात काढण्यात आला. खंडोबा चौकातून सुरू झालेला हा मोर्चा तहसील कार्यालयापर्यंत वारकऱ्यांच्या टाळ-मृदंगाच्या गजरात पार पडला.

मोर्चानंतर नायब तहसिलदार राहुल बनसोडे यांना निवेदन सादर करण्यात आले. गोहत्याबंदीची कठोर अंमलबजावणी करावी, गाईला राष्ट्रीय दर्जा द्यावा तसेच दरवर्षी प्रत्येक शासकीय कार्यालयात 'गोपुजन उत्सव' अनिवार्य करावा, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या.

परमेश्वर नलावडे, संतोष तोतला, राजू लोहिया, नरेश मानधने यांच्या शिष्टमंडळाने निवेदन दिले. यावेळी काकासाहेब कदम, बिबीचंद्र पठाडे, एकनाथ कदम, अशोक चांडक, विकास ढगे, सुरेश मानधने, सामाजिक कार्यकर्ते दिनेश पारीख, रखमाजी महाराज नवले, राहुल पगारे, प्रसाद खिस्ती, दीपक लखमले, कमलेश देशपांडे आदी उपस्थित होते. मोर्च्याची सांगता 'पसायदान'ने करण्यात आली.

# ६ गुंठे जागेवर गोवंश खाटकांचे अतिक्रमण

### केंद्र सरकारच्या मालमत्तेवर बेकायदा कत्तलखाना; कारवाईकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पैठण–** शहराच्या मध्यवर्ती भागातील केंद्र सरकारच्या अखत्यारीतील सुमारे ६ गुंठे जागेवर गोवंश खाटकांनी अतिक्रमण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या ठिकाणी बेकायदा कत्तलखाना सुरू असून, त्यासोबतच काही बांधकामेही उभारण्यात आल्याने परिसरात अस्वच्छता आणि दुर्गंधीचे वातावरण पसरले आहे.

माहितीनुसार, संबंधित जागा ही टपाल (डाक) विभागाच्या मालकीची असून सुमारे ६ हजार चौरस फुटांचा हा भूखंड आहे. गेल्या अनेक वर्षांपासून येथे अतिक्रमण होत असून, शेड उभारून गोवंश कत्तलीचे काम सुरू असल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या प्रकरणी नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही नगर परिषद, पोलीस प्रशासन तसेच संबंधित विभागांकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, संबंधित अतिक्रमण तात्काळ हटवून परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून जोर धरत आहे.

# सेशन कोर्टाच्या निकालाविरोधात काते कुटुंबाचे उपोषण

### ''पुराव्यांकडे दुर्लक्ष करून अन्यायकारक शिक्षा'' कुटुंबीयांचा आरोप | चौकशी व कारवाईची मागणी

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा न्यायालयाच्या सेशन कोर्टाने दिलेल्या निकालाविरोधात अन्याय झाल्याचा आरोप करत भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा उपाध्यक्ष साहेबराव काते यांनी आपल्या कुटुंबीयांसह जिल्हा न्यायालयाच्या प्रवेशद्वारासमोर बेमुदत उपोषण सुरू केले. या आंदोलनात सुशिला काते, अनिता जाधव, रेखा भोगले, श्रद्धा काते, आराधना भोगले, अंकिता भोगले, राणी जाधव, सिताबाई रोकडे, सीमा काते, शंकर काते, संतोष उघडे यांच्यासह काते परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



काते यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, ते सामाजिक कार्यकर्ते असून भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ता म्हणून काम करतात. त्यांच्या मुलगा राजू साहेबराव काते याच्याविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात ११ नोव्हेंबर २०२१ रोजी एका महिलेने भारतीय दंड विधान कलम ३७६, ४५२, ३२४, ५०४, ५०६ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी या प्रकरणात तपास करून न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.

या प्रकरणात ६ वे जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी १२ मार्च २०२६ रोजी राजू काते यास दोषी ठरवत १० वर्षे सक्त मजुरी व दंडाची शिक्षा सुनावली. मात्र, हा निकाल वस्तुस्थितीचा योग्य विचार न करता देण्यात आल्याचा गंभीर आरोप काते यांनी केला आहे.

काते यांच्या मते, संबंधित महिलेने सुरुवातीला रुग्णालयात उपचारादरम्यान ''अनोळखी व्यक्तीने अत्याचार केला'' असे सांगितले होते, अशी नोंद वैद्यकीय कागदपत्रांत आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी तिने कथितरीत्या नाव बदलून राजू काते याच्यावर आरोप केला. यामुळे संपूर्ण प्रकरण संशयास्पद असल्याचा दावा त्यांनी केला.

तसेच, या प्रकरणातील डीएनए तपासणी अहवाल कायद्यानुसार ९० दिवसांत मिळणे अपेक्षित असताना तो सुमारे १४ महिन्यांनी सादर करण्यात आला. विशेष म्हणजे, दोन्ही वेळच्या डीएनए अहवालात निष्कर्ष 'निगेटिव्ह' आले असतानाही न्यायालयाने त्याकडे दुर्लक्ष करून शिक्षा ठोठावली, असा आरोप काते यांनी केला आहे.

''माझा मुलगा मागासवर्गीय असल्यामुळे त्याच्याशी जातीवाचक भेदभाव करण्यात आला आणि जाणीवपूर्वक अन्यायकारक निर्णय देण्यात आला,'' असा गंभीर आरोपही त्यांनी निवेदनात केला आहे.

दरम्यान, या निकालाविरोधात राजू काते यांनी छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयाच्या खंडपीठात अपील दाखल केले आहे. तसेच, निकालपत्र देण्यातही विलंब करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला असून, न्यायालयाने निकाल जाहीर झाल्यानंतर तत्काळ प्रत उपलब्ध करून देणे आवश्यक असतानाही संध्याकाळी उशिरा ती देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

# चोंडीच्या नियोजनबद्ध विकासातून पर्यटनाला चालना मिळणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## पर्यटकांसाठी दर्जेदार सुविधा उभाराव्यात । श्री क्षेत्र चोंडी विकास आराखडा आढावा बैठक

**मुंबई । वृत्तसंस्था–** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा आदर्श कायम स्मरणात राहणार आहे. त्यांच्या जीवनकार्यातून नवीन पिढीला प्रेरणा मिळावी, या उद्देशाने चौंडी गावाचा विकास करण्याच्या दृष्टीने अनेक विकासकामे हाती घेण्यात आलेली आहेत. चोंडीचा विकास सर्वसमावेशक व नियोजनबद्ध पद्धतीने करत दर्जेदार सुविधांच्या माध्यमातून पर्यटनास चालना देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळ, चोंडी येथील जतन, संवर्धन व विकास आराखड्यासंदर्भात बैठक वर्षा निवासस्थान येथे झाली. या बैठकीस विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, नियोजन



विभागाच्या शैला ए, जलसंपदा विभागाचे सचिव डॉ. संजय बेलसरे, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया तसेच संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जलव्यवस्थापनाच्या उपाययोजनांवर विशेष भर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, चोंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळाच्या सर्वांगीण विकासासाठी ६८१ कोटींची तरतूद करण्यात आली असून, या प्रकल्पांतर्गत स्मारक परिसरात भव्य पुतळा, सुशोभित उद्यान, नदीकाठाचा विकास, आधुनिक संग्रहालय, ओपन एअर थिएटर आणि पर्यटन सुविधा केंद्र उभारण्यात येणार आहेत. स्मारक परिसरात कायमस्वरूपी पाण्याची उपलब्धता करण्यासाठी जलव्यवस्थापनाच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात यावा. तसेच हरित क्षेत्र आणि मोकळ्या जागांचा समतोल राखत परिसराचे सौंदर्यीकरण करावे. बुडीत बंधाऱ्यांऐवजी ‘बॅरेज’ उभारण्याबाबत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करावी. मंदिर परिसरातील भूसंपादन जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून करावे. प्रकल्पातील काही सुविधा उभारणी व देखभालीसाठी खासगी भागीदारी (पीपीपी मॉडेल) आणण्याबाबत सकारात्मक विचार सुरू असून, यामुळे पर्यटन सुविधा अधिक दर्जेदार, कार्यक्षम व दीर्घकालीन टिकाऊ पद्धतीने विकसित करता येणार असल्याचे श्री फडणवीस म्हणाले.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ३६० कोटींच्या रस्ते प्रकल्पातील दोन कामांसाठी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. प्रकल्पासाठी आवश्यक जागेच्या सीमारेषा निश्चित करण्यासाठी वन, सार्वजनिक बांधकाम, जलसिंचन विभाग आणि ग्रामपंचायत यांनी संयुक्त मोजणी केली असून सीमारेषा निश्चित करण्यात आल्या आहेत. चोंडी येथील स्मारकाचा विकास नियोजनबद्ध पद्धतीने आणि टप्प्याटप्प्याने केला जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे म्हणाले, चोंडी विकास आराखड्यात इतिहास, संस्कृती आणि पर्यटन यांचा समन्वय साधत स्थानिक विकास व रोजगारनिर्मितीला चालना देण्याचा शासनाचा मानस आहे. याशिवाय परिसराचे सौंदर्यीकरण, जलसौंदर्य, हरित क्षेत्र, तसेच पर्यटकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करून चोंडीला आकर्षक पर्यटनस्थळ म्हणून उभारण्याचे नियोजन आहे.

## दै. आकर्षण निवडक

### महापालिकेचे आरोग्य केंद्र झोपडपट्टीतील नागरिकांसाठी आधार -उडाणशिवे



अहिल्यानगर - अहिल्यानगर शहरातील सर्वात मोठी आणि जुनी झोपडपट्टी म्हणून ओळख असलेल्या रामवाडी परिसरात आरोग्य सुविधांच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे. येथे प्रमुख्याने कचरा वेचक, कष्टकरी कामगार व रोजंदारीवर उदरनिर्वाह करणारा वर्ग मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असून, या नागरिकांसाठी आरोग्य सेवा पूर्वी मोठे आव्हान होते. मात्र त्यांच्या आरोग्याचा प्रश्न सुटण्यास मदत होत असल्याचे प्रतिपादन कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतच्या अहिल्यानगर शाखेचे निमंत्रक विकास उडाणशिवे यांनी केले. महानगरपालिकेच्या वतीने रामवाडी येथे उभारण्यात आलेले आरोग्य केंद्रात समता फाउंडेशनच्या वतीने आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पुढे बोलताना उडाणशिवे म्हणाले की, महानगरपालिकेच्या वतीने रामवाडी येथे उभारण्यात आलेले आरोग्य केंद्र आज अनेक गरजूंसाठी जीवनदान देण्याचे कार्य करत आहे. या केंद्रामध्ये सामान्य तपासणी, औषधोपचार, लसीकरण तसेच विविध आरोग्य सुविधा उपलब्ध होत असल्याने परिसरातील नागरिकांचा आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी झाला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. या शिबिरामध्ये डॉ. अभिषेक शिंदे व डॉ. आनंद बोजा यांनी ४० कचरा वेचक कामगारांची नेत्र तपासणी केली. त्यापैकी १५ कचरा वेचक कामगारांची मोतीबिंदूची मोफत शस्त्रक्रिया करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे अनेक गरजू कुटुंबांना मोठा आधार मिळणार आहे. या उपक्रमासाठी रामवाडी आरोग्य केंद्राच्या स्टाफ नर्स रोहिणी बोरुडे तसेच सहसेविका नीता उडानशिवे आणि देविदास पोंडे यांनी विशेष परिश्रम घेतले. महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या विशेष सहकार्यामुळे रामवाडी येथे हे आरोग्य केंद्र उभारण्यात आले. आज कचरा वेचक तसेच अन्य कामगारांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान हे आयुक्त डांगे यांच्या संवेदनशील निर्णयामुळेच शक्य झाले. शहराच्या इतर भागातील आरोग्य केंद्रात १० रुपये घेतले जातात, परंतु रामवाडी केंद्रावर विनामूल्य आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आल्याने आयुक्तांचे आभार मानण्यात आले. कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतच्या वतीने या सामाजिक व आरोग्यदायी उपक्रमाचे स्वागत करण्यात आले असून, समाजातील कष्टकरी व वंचित घटकांसाठी असे उपक्रम सातत्याने राबविण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

### बेकायदेशीर जातपंचायतीत गायकवाड कुटुंबावर जीवघेणा हल्ला

अहिल्यानगर- राज्यात जातपंचायतींना कायद्याने बंदी असतानाही आष्टी तालुक्यातील कानडी बुद्रुक येथे बेकायदेशीर जातपंचायत भरवून गायकवाड कुटुंबावर बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असला तरी मुख्य आरोपी अद्याप पोलिसांच्या ताब्यात नसल्याने संताप व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गावातील दोन गटांमध्ये सुरू असलेल्या जमिनीच्या वादावर तोडगा काढण्यासाठी काही व्यक्तींनी जातपंचायत बोलावली होती. या पंचायतीत बाबुराव साहेबराव फुलमाळी, गंगाराम शंकर फुलमाळी, सरपंच गुलाब गोपाळा गायकवाड, महेश बोरा गायकवाड, माणिक साहेबा फुलमाळी, भीमा साहेबराव फुलमाळी आणि बाजीराव सठवा फुलमाळी यांचा सहभाग होता. मात्र, वाद सोडवण्याऐवजी पंचांनी परिस्थिती अधिक चिघळवली. काही पंचांनी दुसऱ्या गटाकडून पैसे घेऊन एका गटाला दुसऱ्यावर हल्ला करण्यास प्रवृत्त केल्याचा गंभीर आरोपही समोर आला आहे. यानंतर वाद विकोपाला जाऊन गायकवाड कुटुंबातील यल्लाप्पा शिवराम गायकवाड, किरण गायकवाड आणि चंदा किरण गायकवाड यांच्यावर लोखंडी रॉडने डोक्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात तिघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. घटनेनंतर संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून काही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. तथापि, या प्रकरणातील मुख्य आरोपी बाबुराव साहेबराव फुलमाळी हा अद्याप फरार असून त्याच्याकडून गायकवाड कुटुंबीयांना गावात परतल्यास जीव मारण्याच्या धमक्या दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पीडित कुटुंब भयभीत अवस्थेत आहे.

# डॉ. एकनाथराव ढाकणे यांना ग्रामसेवारत्न पुरस्कार प्रदान



(छाया : बाबा पालवे)

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जन्मदिनानिमित्ताने शिर्डी येथे डेबूजी प्रतिष्ठाण महाराष्ट्र राज्य व कवी सरकार वाचनालय इंगळी कोल्हापूर यांच्या वतीने राष्ट्रसंत गाडगेबाबा मराठी साहित्य संमेलन पार पडले.

या संमेलनाच्या निमित्ताने राष्ट्रीउभारणीसाठी काम करणाऱ्या व गाडगेबाबा यांच्या आदर्श दशसूत्रीप्रमाणे काम करणाऱ्या व्यक्तींना या संमेलनात गौरविण्याचा मानस डेबूजी प्रतिष्ठाणने घेतला होता. त्याप्रमाणे प्रस्ताव न मागता प्रतिष्ठानने स्वतः शोधून व्यक्तींची निवड केली.

डॉ. एकनाथराव ढाकणे यांनी आपल्या संपूर्ण नोकरीच्या कालावधीमध्ये ग्रामविकास अधिकारी ते विस्तार अधिकारी या पदावर काम करतांना आपले नोकरीचे गांव आदर्श केले. यात गाडगेबाबा यांना अभिप्रेत असलेले ग्रामस्वच्छता अभियान व इतरही शासकीय योजनांची उत्कृष्ट अंमलबजावणी केल्याने नोकरीच्या प्रत्येक ठिकाणच्या गावांना शासनाचे पुरस्कार मिळवून दिले. ग्रामसेवकांचे नेते म्हणून १३६ या ग्रामसेवक संघटनेच्या राज्याध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळताना शासनपातळीवर ग्रामसेवकांचे वर्षानुवर्ष रखडलेले ग्रामसेवकांचे प्रश्न शिताफीने सोडवले. प्रत्येक ग्रामसेवकांच्या सुखदुःखात ते कायम हजर असतात व मदत ही करतात. त्यांची ही आदर्श सेवा डेबूजी प्रतिष्ठाण व कवी सरकार इंगळी यांना भावली. म्हणून त्यांची ग्रामसेवारत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. त्याप्रमाणे शिर्डी येथे दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या राष्ट्रसंत गाडगेबाबा मराठी साहित्य संमेलनाच्या पुरस्कार वितरण समारोहात भारतीय धोबी महासंघाचे राष्ट्रीय वरिष्ट उपाध्यक्ष श्री. एकनाथराव बोरसे व संमेलनाध्यक्ष श्री. राजेंद्र फंड यांच्या हस्ते त्यांना ग्रामसेवारत्न पुरस्कार सन्मानाने प्रदान करण्यात आला.

याचबरोबर या संमेलनात ते प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते शिक्षकरत्न, समाजरत्न, साहित्यरत्न पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

यावेळी आयोजक श्री. सुनील निकम, श्री.माधवराव देसाई, श्री. अनिल देसाई, श्री. विलासराव रोकडे, सौ. राजश्री फंड या उपस्थित होत्या.

# कापडबाजार मधील नो हॉकर्स झोन व ‘पे अँड पार्क’ला हॉकर्स युनिटी असोसिएशनचा तीव्र विरोध

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील कापड बाजार, मोची गल्ली आणि शहाजी रोड परिसरात महापालिका प्रशासनाच्या वतीने प्रस्तावित ‘नो हॉकर्स झोन’ आणि ‘पे अँड पार्क’ योजनेला हॉकर्स युनिटी असोसिएशनच्या वतीने तीव्र विरोध दर्शविण्यात आला आहे. यासंदर्भात सोमवारी (दि. २७ एप्रिल) महापालिकेत अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर यांच्या उपस्थितीत झालेल्या सुनावणीत असोसिएशनच्या शिष्टमंडळाने आपली भूमिका ठामपणे मांडत हरकती नोंदवल्या आणि निवेदन दिले.

या वेळी हॉकर्स युनिटी असोसिएशनचे अध्यक्ष साहेबान जहागीरदार, संतोष रासने, नवेद शेख, अन्सार पठाण, फिरोज पठाण, लक्ष्मी शिंदे, सुनीता शिंदे, दत्ता शिंदे, रुक्मिणी बिदरे, अलीम गफ्फार, सज्जाद रंगरेज, जावेद शेख, अन्सार पठाण, मुजाहिद पठाण, नितीन वाळके, नितीन पवार, हमजा शेख, अशरफ सय्यद, मीनाक्षी शिंगी, लता वाघमारे, परविन बागवान, अल्फिया शेख, कादर शेख, तारीक तांबोळी आदींसह हॉकर्स महिला व बांधव उपस्थित होते.

शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात नमूद केले की, मागील ४० ते ५० वर्षांपासून पथविक्रेते या परिसरात व्यवसाय करत असून, ते नियमितपणे महापालिकेला कर भरत आहेत. अचानक या भागाला ‘नो हॉकर्स झोन’ घोषित केल्यास हजारो कुटुंबांवर उपासमारीची वेळ येईल. त्यामुळे हा निर्णय तात्काळ रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली.

निवेदनात केंद्र सरकारच्या ‘पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४’ चा दाखला देत प्रशासनावर नियमभंगाचा आरोप करण्यात आला. असोसिएशनने स्पष्ट केले की, बायोमेट्रिक सर्वेक्षण झालेल्या पथविक्रेत्यांना प्रमाणपत्र देऊन पुनर्वसन केल्याशिवाय त्यांना हटवता येत नाही. अधिनियमाच्या कलम ३(३) नुसार हे संरक्षण (‘शिल्ड’) लागू होते, असेही नमूद करण्यात आले.

शहरातील ‘नो हॉकर्स झोन’ किंवा वाहतूक आराखडा तयार करताना ‘टाउन वेंडिंग कमिटी’ (टीव्हीसी) चे मत घेणे बंधनकारक असताना, या प्रक्रियेत हॉकर्सचे प्रतिनिधित्व विचारात घेतले गेले नाही, असा आरोप करण्यात आला. तसेच कायद्यानुसार टीव्हीसी मध्ये किमान ४०% सदस्य हे हॉकर्स प्रतिनिधी असणे आवश्यक आहे, मात्र प्रत्यक्षात तसे दिसत नसल्याचे सांगण्यात आले.

महापालिकेने वाहतुकीच्या कारणास्तव बदल करायचा असल्यास,



त्याच परिसरात अधिकृत ‘हॉकर्स झोन’ विकसित करून कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. ‘नॅशनल पॉलिसी ऑन अर्बन स्ट्रीट वेंडर्स (२००९)’ नुसार रस्त्यावर व्यवसाय करणे हा गरीबांच्या उपजीविकेचा मूलभूत अधिकार असल्याचेही अधोरेखित करण्यात आले.

‘पे अँड पार्क’ योजनेमुळे केवळ वाहनधारकांना सोय होईल, तर हॉकर्समुळे सर्वसामान्य नागरिकांना स्वस्त दरात वस्तू मिळतात, असा मुद्दा उपस्थित करण्यात आला. तसेच रस्त्यावर पार्किंगसाठी उभ्या राहणाऱ्या गाड्यांमुळेही वाहतुकीत अडथळा निर्माण होणार असल्याने हा निर्णय व्यवहार्य नसल्याचे सांगण्यात आले. हॉकर्सनी स्पष्ट केले की, ते आपल्या व्यवसायादरम्यान वाहतुकीस अडथळा होणार नाही याची काळजी घेतील. मात्र, व्यवसाय बंद करणे हा उपाय नसून प्रशासनाने समन्वय साधावा, अशी विनंती करण्यात आली.

कापड बाजार, मोची गल्ली आणि शहाजी रोड परिसरातील नो हॉकर्स झोन व पे ॲण्ड पार्कला संघटनेचा विरोध असून, हा निर्णय बेकायदेशीर असल्याचा आरोप करण्यात आला आहे. टाउन वेंडिंग कमिटीचा सल्ला न घेता सुनावणी घेणे चुकीचे असल्याचे सांगण्यात आले. अनेक हॉकर्सचे बायोमेट्रिक झाले असून, काहींना प्रमाणपत्र देखील मिळाले आहे. त्यांचे पुनर्वसन केल्याशिवाय त्यांना हटवता येणार नाही. रस्त्यावर पार्किंगसाठी उभ्या राहणाऱ्या गाड्यांमुळेही अतिक्रमण होणार असून, त्यामुळे वाहतुकीची समस्या सुटणार नाही. प्रशासनाने आधी टिव्हीसी समोर मुद्दा मांडून त्यांचे मत घ्यावे, त्यानंतरच पुढील निर्णय घ्यावा. -साहेबान जहागीरदार (अध्यक्ष, हॉकर्स युनिटी असोसिएशन) यांनी व्यक्त केले.

# सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते पारनेर तालुक्यातील ६०० बांधकाम कामगारांना प्रमाणपत्रांचे वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पारनेर तालुक्यात इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांना गती देत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सुमारे ६०० महिला व पुरुष कामगारांना प्रमाणपत्रांचे वितरण शिवसेना नेते तथा जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते पार पडला.

कार्यक्रमावेळी उपस्थित लाभार्थ्यांना मंडळाच्या विविध योजनांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच नोंदणीकृत कामगारांना मिळणाऱ्या सुविधा, अर्ज प्रक्रिया आणि योजनांचा लाभ कसा घ्यावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या प्रमाणपत्रामुळे कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेणे सुलभ होणार आहे.

यावेळी बोलताना यांनी सांगितले की, पारनेर तालुक्यातील आणखी हजारो महिला कामगारांना या योजनेचा लाभ देण्यासाठी काम सुरू असून, महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे. बांधकाम क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांना आर्थिक व सामाजिक सुरक्षा देण्यासाठी या योजनांचा व्यापक वापर केला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून या योजनेची व्याप्ती आणखी वाढविण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या योजनेत येणाऱ्या त्रुटी बाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सविस्तर निवेदन देऊन या योजनेत जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असून भविष्यात शिवसेना पक्ष यासाठी कायम कार्यरत राहणार असल्याचे प्रतिपादन सुजित झावरे पाटील यांनी केले. तसेच जास्तीत जास्त कामगारांना योजनांचा लाभ मिळावा यासाठी तालुक्यातील विविध भागांत विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणाही यावेळी करण्यात आली. शिवसेना पदाधिकारी कार्यकर्त्यांमार्फत गावोगावी याबाबत जागृती करणार असून या माध्यमातून योजना तळगाळात पोहचवीणार असल्याचे सुजित झावरे पाटील यांनी सांगितले.

या उपक्रमामुळे पारनेर तालुक्यातील बांधकाम कामगारांना शासनाच्या योजनांचा थेट लाभ मिळण्यास मदत होणार असून, विशेषतः महिला कामगारांच्या सक्षमीकरणाला चालना मिळणार आहे. तसेच जास्तीत जास्त कामगार या माध्यमातून सक्षम होणार असल्याचे सुजित झावरे पाटील यांनी सांगितले.

यावेळी पारनेर तालुका महिला अध्यक्ष कोमलताई भंडारी, जिल्हा उपप्रमुख प्रियंकाताई खिलारी, उपतालुका प्रमुख मंगलताई शेंडकर, सरपंच विमलताई झावरे, रणजित काका पाटील, सूर्यभान भालेकर, स्वप्निल राहिंज, दिलीप पाटोळे शंकर बर्वे, बाळासाहेब शिंदे, संदीप भंडारी, लक्ष्मण झावरे, मारुती उगले, बाळासाहेब झावरे, प्रसाद झावरे, चिमाजी वाळुंज, रेश्मा राजे, तोसिफ राजे, पोपटराव झावरे, प्रसाद झावरे, अशोक चेमटे, मान्यवर मंडळी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# श्री विशाल गणेश मंदिरात माजी हिंद केसरी पै. योगेश दोडके यांचा सन्मान

## कुस्ती हा आपल्या संस्कृतीचा वारसा– पै.योगेश दोडके

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री विशाल गणेश मंदिर येथे माजी हिंदकेसरी योगेश दोडके यांनी नुकतीच भेट दिली. यावेळी देवस्थानच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी देवस्थानचे सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त प्रा. माणिकराव विधाते यांच्यासह पै. अजिंक्य विधाते, सोमनाथ तांबे, शेखर दळवी, मयूर कुलथे, हरिभाऊ येलदंडी, उमेश हराळे, भावेश शेंडगे आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी मान्यवरांच्या हस्ते श्री विशाल गणेशाची आरती करण्यात आली यानंतर त्यांचा देवस्थानच्या वतीने शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. .

यावेळी बोलताना पै योगेश दोडके म्हणाले कि , श्री गणेशाचे आशिर्वाद आणि गुरूंचे मार्गदर्शन यामुळेच मला हिंदकेसरी हा मानाचा किताब मिळवता आला. आज या पवित्र ठिकाणी येऊन मला खूप आनंद होत आहे. मंदिर हे केवळ श्रद्धेचे केंद्र नसून ते समाज एकत्र येण्याचे ठिकाण आहे.

ते पुढे म्हणाले, ‘‘आजच्या तरुणांनी मोबाईल आणि इतर व्यसनांपासून दूर राहून क्रीडा क्षेत्रात पुढे यावे. कुस्ती हा आपल्या संस्कृतीचा वारसा आहे. योग्य प्रशिक्षण आणि मेहनतीच्या जोरावर ग्रामीण भागातील खेळाडूही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव कमावू शकतात. यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची गरज आहे.’’

यावेळी बोलताना सचिव अशोकराव कानडे म्हणाले की, ‘‘योगेश दोडके यांसारखे खेळाडू हे आपले आदर्श आहेत. त्यांच्या यशामुळे अनेक तरुणांना प्रेरणा मिळते. देवस्थानच्या वतीने अशा मान्यवरांचा सन्मान करणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.’’

प्रा माणिकराव विधाते म्हणाले, ‘‘श्री विशाल गणेश मंदिर हे केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे केंद्र बनावे, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. भविष्यातही अशा प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन करून सर्वांना एकत्र आणण्याचा आमचा प्रयत्न राहील.’’

देशसेवेचा अभिमान !

# अहिल्यानगरचा महेश जंजिरे सीआरपीएफमध्ये बनलाय असिस्टंट कमांडंट

## अहिल्यानगर जिल्ह्यातर्फे आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्या हस्ते झाला विशेष गौरव





दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगरच्या मातीचा आणखी एक हिरो देशसेवेसाठी सज्ज झाला आहे महेश ईश्वर जंजिरे यांनी यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण करून सी आर पी एफ मध्ये थेट असिस्टंट कमांडंट म्हणून दमदार एंट्री घेतली आहे.

दिल्लीतील सीआरपीएफ ॲकॅडमीमध्ये खडतर प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर आता त्यांची नियुक्ती जम्मू–काश्मीरमधील संवेदनशील कुपवाडा सेक्टरमध्ये झाली आहे. म्हणजेच थेट देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या फ्रंटलाईनवर ते उभे राहणार आहेत.

या अभिमानास्पद यशाबद्दल महेश जंजिरे यांचा अहिल्यानगर जिल्हयाच्या वतीने लोकप्रिय आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी आमदारांनी महेश जंजिरे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या यशाचा गौरव केला.

महेश जंजिरे यांनीही तरुणांसाठी एक पॉवरफुल मेसेज दिला. सीआरपीएफ ही देशातील सर्वात मोठी पोलीस कॅडर संस्था असून, देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी कायम तत्पर आहे, असे जंजिरे म्हणाले. इच्छुक व जिद्द असलेल्या युवकांना यूपीएससी आणि स्पर्धा परीक्षांसाठी मोफत मार्गदर्शन करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

याच कार्यक्रमात त्यांच्या महेश जंजिरे यांच्या पत्नी वास्तुविशारद काजल जंजिरे यांचाही सन्मान करण्यात आला. छत्रपती संभाजी महाराज यांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव येथील बहादुरगड या किल्ल्याच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशावर आधारित अभ्यासावर त्यांनी केलेल्या संशोधनाला दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय संस्थेकडून प्रशस्तीपत्र मिळाले असून, ते संग्राम जगताप यांच्या हस्ते काजल जंजिरे यांना प्रदान करण्यात आले.

अहिल्यानगरचे प्रथम महापौर भगवान फुलसौंदर, बांधकाम व्यावसायिक ईश्वर जंजिरे, बचत गटाच्या नेत्या सुनीता जंजिरे, ॲड. सविता बोठेपाटील, यश बोठेपाटील यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. एकीकडे देशसेवा आणि दुसरीकडे संशोधनातून संस्कृती जपण्याचा प्रयत्न करीत असल्याने जंजिरे कुटुंब आज अनेक तरुणांसाठी एक प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

# माणिकताई करंदीकर विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींच्या स्नेहमेळाव्यात 'माहेर' भेटीचा आनंद

## १९६५ पासून आजपर्यंतच्या माजी विद्यार्थिनी आल्या एकत्र; आठवणींनी भारले शाळेचे वातावरण । ही संस्था म्हणजे मुलींचे माहेरच –डॉ. निरज करंदीकर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** येथील जानकीबाई आपटे बालिका आश्रम संस्था संचलित माणिकताई करंदीकर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, बालिकाश्रम रोड येथील मुलींच्या शाळेच्या १९६५ पासून आजपर्यंतच्या माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या मैत्रिणी, शिक्षक आणि शाळेच्या आठवणींनी संपूर्ण परिसर अक्षरशः भारावून गेला.

या मेळाव्यास राज्यभरातून सुमारे पाचशेहून अधिक माजी विद्यार्थिनी उपस्थित राहिल्या. पुणे, ठाणे, कल्याण, मुंबई, औरंगाबाद, नाशिक तसेच जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या विद्यार्थिनींनी पुन्हा एकदा शाळेच्या आवारात आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. कोणी आजी, कोणी आई, काकू, मावशी झालेल्या या सर्वांनी एकमेकींना भेटताच जुन्या आठवणींमध्ये हरवून गेल्या. शाळेतील वर्ग, मैदान आणि परिसर मैत्रीच्या हास्याने गजबजून गेला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. निरज करंदीकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या सचिव सौ. दीप्ती करंदीकर, माजी विद्यार्थिनी व विद्यमान नगरसेविका आशा डागवाले, नगरसेविका सुनीता फुलसौंदर, बुरुडगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश्री कुंटला, बालिकाश्रम बालक मंदिर प्राथमिक शाळेच्या माजी मुख्याध्यापिका राधिका लगड, सेवानिवृत्त ज्येष्ठ शिक्षिका हेमा चाफेकर यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यालयाचे आजी–माजी शिक्षकवृंदही मोठ्या संख्येने



उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य अनिल सुद्रिक यांनी प्रास्ताविकात संस्थेचा गौरवशाली इतिहास उलगडला. इ.स. १९४३ मध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि उपेक्षित मुलींसाठी शिक्षणाची दारे खुली करण्याच्या उदात्त हेतूने कै. जानकीबाई आपटे यांनी या संस्थेची स्थापना केली. त्या काळात मुलींच्या शिक्षणाकडे समाज गांभीर्याने पाहत नसतानाही त्यांनी शिक्षणाचा दीप प्रज्वलित केला, ही गोष्ट आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यानंतर कै. माणिकताई करंदीकर यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली विद्यालयाने शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले. तसेच कै. डॉ. जयंत करंदीकर यांच्या प्रेरणादायी कार्यामुळे संस्थेच्या प्रगतीला अधिक बळ मिळाले. या तिन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या त्याग, दूरदृष्टी आणि कार्यामुळेच संस्थेचा भक्कम पाया उभा राहिला असून, आजचा विकास हा त्यांच्या कार्याचा जिवंत वारसा असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.माणिकताई करंदीकर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजने हजारो विद्यार्थिनी घडवून त्यांना विविध क्षेत्रांत यशस्वी बनविले आहे. शिक्षण, वैद्यकीय, सामाजिक, प्रशासकीय आणि राजकीय क्षेत्रात अनेक माजी विद्यार्थिनी उल्लेखनीय कार्य करत असून, हीच संस्थेच्या कार्याची खरी पावती असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

प्राचार्य सुद्रिक यांनी सर्व माजी विद्यार्थिनींना सामाजिक बांधिलकी जपत संस्थेला सहकार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगदान देणारे दाते, सेवाभावी व्यक्ती, स्वयंसेवक आणि सर्व उपस्थितांचे त्यांनी आभार मानले. यावेळी माजी विद्यार्थिनींच्या मनोगताचा कार्यक्रम विशेष भावनिक ठरला. अनेकांनी शाळेने दिलेले संस्कार, शिक्षकांचे मार्गदर्शन, मैत्रीच्या आठवणी आणि आयुष्यात घडवलेल्या व्यक्तिमत्त्वाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. काही जणी जुन्या आठवणी सांगताना भावूक झाल्या.

कलाक्षेत्रातील योगदानाबद्दल आ. काशिनाथ दाते यांच्याकडून दखल

# जेष्ठ अभिनेते डॉ. सुरेश शिंदे यांचा केला सन्मान



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**भाळवणी–** कलेच्या नाट्य व मराठी चित्रपट क्षेत्रात सुमारे पंधरा पुरस्कार प्राप्त मराठी चित्रपट व दहा लघुपट आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजले असताना माळकुप सारख्या खेडेगावातून शिक्षण घेऊन नगर येथे स्थायिक झालेल्या व भाळवणी येथे आपला डॉक्टरी पेशा सांभाळत कलेच्या माध्यमातून सातासमुद्रापार मराठी चित्रपटाचा झेंडा फडकवला.

डॉ. सुरेश शिंदे यांनी नुकत्याच पार पडलेल्या लघु चित्रपट पत्रावळ यामध्ये मुख्य भूमिका पार पाडल्यामुळे संस्कृती कलादर्पण लक्षवेधी लघुपट पुरस्कार मिळाला. जेष्ठ अभिनेते डॉ. सुरेश शिंदे यांचे अनेक चित्रपटातील अभिनयाबद्दल राष्ट्रीय आंतराष्ट्रीय महोत्सवात गाजलेला भुमिकांची दखल घेऊन एकुनच कलेच्या प्रांतातील भरारीबद्दल आज पारनेर – नगर तालुका विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार काशिनाथ दाते यांनी अभिनयाच्या कारकिर्दीची दखल घेऊन डॉक्टर सुरेश शिंदे यांचा यथोचित सन्मान व सत्कार केला. त्यांचा निळावंती जुलैमध्ये महाराष्ट्र भर प्रदर्शित होत असून सध्या एका हिंदी चित्रपटाचे चित्रीकरण सुरू आहे.

यावेळी युवा नेते डॉ. प्रदीप दाते, पत्रकार संपत कपाळे, पत्रकार शिवशंकर शिंदे व संतोष तांबे उपस्थित होते.

# सारडा महाविद्यालयाची क्रीडा क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी – आमदार संग्राम जगताप

## सारडा महाविद्यालयात वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** एखादे स्पर्धेची उंची गाठणे सोपे नाही.त्यासाठी खेळाडूंनी सातत्याने सराव करणे आवश्यक आहे.खेळाडूंनी यशस्वी व्हावे.यासाठी पालकवर्ग व शिक्षक हे देखील परिश्रम घेत असतात.मुलींना देखील क्रीडा क्षेत्रात चांगल्या संधी निर्माण झाल्या आहेत.हिंद सेवा मंडळाने सारडा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना खेळासाठी मोठे प्रोत्साहन दिले आहे.त्यामुळेच सर्व क्रीडाप्रकारात सारडा महाविद्यालयातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडले आहेत.सारडा महाविद्यालयाने क्रीडा क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी केली आहे.असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या सारडा महाविद्यालयात वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करून व हनुमानाच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.याप्रसंगी उपमहापौर धनंजय जाधव, सामाजिक कार्यकर्ते अनिल ढवण,हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, माजी कार्याध्यक्ष अँड.अनंत फडणीस,प्रा.ज्योती कुलकर्णी,जगदीश झालानी, प्राचार्य प्रा.डॉ.माहेश्वरी गावित कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.गिरीश पाखरे, पर्यवेक्षक प्रा.कुमावत,प्रबंधक अशोक असेरी,माजी विद्यार्थी व खेळाडू प्रा.डॉ.रोहित आदलिंग,प्रा.संजय धोपावकर,प्रा.संजय साठे, प्रा.साईनाथ थोरात,प्रा.अक्षय कर्डिले,प्रा.योगीता गावडे आदी उपस्थित होते.

उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले, ''शरीर निरोगी व सुदृढ राहण्यासाठी खेळ खेळणे आवश्यक आहे.



सारडा महाविद्यालयात शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्राला प्राधान्य दिले जात आहे.'' सुमतीलाल कोठारी म्हणाले,''विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच खेळाला महत्व देणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा क्षेत्र महत्त्वाचे आहे.वर्षभरात क्रीडा क्षेत्रात विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी केली आहे. त्यामुळे क्रीडा क्षेत्रात जिल्ह्यात सारडा महाविद्यालयाचा मोठा नावलौकिक आहे.''

प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित म्हणाल्या,''शैक्षणिक वर्ष २०२५–२६ चा क्रीडा अहवाल सादर करताना अत्यंत आनंद वाटत आहे.कनिष्ठ महाविद्यालयाने यावर्षी गतवर्षी पेक्षा खूप मोठ्या प्रमाणात विविध शालेय स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाने यश संपादन केले. या वर्षी ६५ क्रीडा प्रकारात मुले व मुली यांनी म.न.पा (जिल्हा) स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळून विभागीय पातळीवर २२० खेळाडूंची तसेच २१ खेळाडूची राज्यस्तरीय विविध खेळामध्ये तर ७ खेळांडूची राष्ट्रीय पातळीवर निवड झाली.

वरिष्ठ विभागात यावर्षी अखिल भारतीय आंतर विद्यापीठ व आंतरविभागीय स्पर्धेत नेत्रदीपक प्रगती करताना अहिल्यानगर विभागाच्या ५३ खेळाडूंची निवड झाली.तर आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संघात दहा खेळाडूंची निवड झाली. यावेळी प्रा.रोहित आदलिंग यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक,मानद सचिव संजय जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा यांनी शुभेच्छा दिल्या.या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थ्यांना मेडल,ट्रॅक सूट व ब्लेजर देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी सारडा महाविद्यालयातील खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रा.संजय धोपावकर (वरीष्ठ विभाग) व प्रा संजय साठे (कनिष्ठ विभाग) यांनी वार्षिक क्रीडा अहवालाचे वाचन केले. सूत्रसंचालन प्रा.योगिता गावडे व प्रा.साईनाथ थोरात यांनी केले.तर आभार प्रा.अक्षय कर्डिले यांनी मानले.या कार्यक्रमासाठी सारडा महाविद्यालयातील खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीत राज्यस्तरीय कॉग्रोत्सव २०२६ मोठ्या उत्साहात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्पर्धेच्या युगात आज प्रत्येक अभियांत्रिकी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी तांत्रिक अभ्यासा सोबतच विविध अभ्यासक्रम आणि अभ्यासेतर उपक्रमांचा देखील अनुभव घेण्याची आवश्यकता आहे. असे प्रतिपादन फाउंडेशनचे तांत्रिक संचालक प्रा. सुनील कल्हापुरे यांनी केले. विळद घाट येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संगणक अभियांत्रिकी विभाग व संगणक अभियंता विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने ''कॉग्रोत्सव–२०२६'' या दोन दिवसीय राज्यस्तरीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या दोन दिवसीय महोत्सवामध्ये टेक केबिसी, युटोपिया (हॅकेथॉन) टेक ट्रेझर हंट, टेकएक्सलरेट, स्क्वीड गेम, रणभूमी, रंगमंच इत्यादी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांचे कौशल्य दाखविण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली. सदर महोत्सवामध्ये राज्यभरातील सुमारे ३५ महाविद्यालयातून ७१० विद्यार्थांनी सहभाग नोंदविला.

या प्रंसगी तांत्रिक संचालक प्रा. सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर, डॉ.रविंद्र तांबे, प्रा.सौ.विद्या जगताप, डॉ. दीपक दरंदले उपस्थित होते. ''कॉग्रोत्सव–२०२६'' च्या कार्यक्रम समन्वयक प्रा. रेणुका देवराय होत्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध मान्यताप्राप्त व्यावसायिक संस्था, संगणक विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. एन.बी.विखे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संगणक अभियंता, विद्यार्थी संघटनेचे सर्व विद्यार्थी यांनी विशेष सहकार्य केले. फाउंडेशनचे डायरेक्टर टेक्निकल प्रा. सुनील कल्हापुरे तसेच प्राचार्य डॉ.रवींद्र नवथर यांनी कार्यक्रमासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

या उपक्रमाचे संस्थेचे डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ.पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, तसेच संस्थेचे चेअरमन व राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कौतुक केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांना वाव मिळाला तसेच महाविद्यालयीन जीवनात आनंदाचे क्षण अनुभवायला मिळाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व संबंधितांचे कौतुक होत आहे.

(पान १ वरून)

## विवेक कोल्हेंच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब?

बदल करत पराभूत उमेदवारांना संधी न देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे. त्याऐवजी संघटनात्मक पातळीवर सातत्याने काम करणाऱ्या, तसेच सामाजिक व जातीय समीकरणे साधू शकणाऱ्या नव्या चेहऱ्यांना प्राधान्य देण्याचा निर्णय पक्षाने घेतला आहे. या पार्श्वभूमीवर विवेक कोल्हे यांचे नाव अधिकच बळकट मानले जात आहे.

**उमेदवारीच्या शर्यतीतील इतर नावे**

भाजपच्या संभाव्य उमेदवारांच्या यादीत अनेक प्रमुख नावांचा समावेश असल्याचे समोर येत आहे. यामध्ये माधवी नाईक, डॉ. उपेंद्र कोठेकर, मनोज कोटक, केशव उपाध्ये, रवी अनासपुरे, राजेश पांडे, दयाशंकर तिवारी, राम सातपुते, रणजितसिंह निंबाळकर, संजय काका पाटील, विवेक कोल्हे, जगदीश मुळीक, प्रमोद जठार, संजय केणेकर, अर्चना पाटील चाकूरकर, दादाराव केचे आणि संजय भेंडे यांचा समावेश आहे. या सर्व नावांमध्ये स्थानिक राजकीय समीकरणे, सामाजिक प्रतिनिधित्व आणि संघटनात्मक कामगिरी या घटकांचा विचार केला जात असल्याचे सांगितले जाते.

**अंतिम निर्णयाकडे लक्ष**

दरम्यान, भाजपची अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर होण्यास अवघे काही तास उरले असताना फडणवीस–कोल्हे भेटीने राजकीय उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. या भेटीमुळे कोल्हे यांच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब होणार का, याकडे केवळ नगर जिल्ह्याच नव्हे, तर संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. आगामी काही तासांत होणाऱ्या घोषणेमुळे या चर्चांना पूर्णविराम मिळणार आहे.

## एसटी महामंडळा मार्फत सवलतीच्या 'डिजिटल कार्ड' वाटप सुरू

आवश्यक आहे.कडक उन्हात नोंदणी कार्यालय सकाळी ८ वाजल्या पासूनच सुरू करावे,तसेच रोटरी क्लब,लायन्स क्लब आणि सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी विविध योग्य ठिकाणी,उपनगरात नोंदणी शिबीर घेणे आवश्यक असल्याचे सूचित केले.

## नेवाशात गोमांस विक्रीवर पोलिसांचा छापा; दोन आरोपी जेरबंद, ४८ हजारांचा मुद्देमाल जप्त

विक्री सुरू आहे. तिथे धाड टाकली असता आवेज आयाज शेख हा मांस विक्री करताना आढळून आला. जप्त मुद्देमाल या दोन्ही ठिकाणाहून पोलिसांनी खालील मुद्देमाल जप्त केला आहे:

१. १५५ किलो गोमांस (अंदाजे किंमत रु. ४६,५००/–)
२. दोन वजन काटे (इलेक्ट्रिक व साधा – किंमत रु. १,५००/–)
३. सत्तूर व इतर साहित्य

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल श्रीनाथ नवनाथ गवळी यांच्या फिर्यादीवरून नेवासा पोलीस ठाण्यात प्रचलित कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सागर ढिकले, हवालदार अजय साठे, श्रीनाथ गवळी, नारायण डमाळे, राम वैद्य, गणेश जाधव आणि सुमित करंजकर यांच्या पथकाने केली आहे.

## शंभर वर्षाच्या संघ वाटचालीमुळे भारत मातेला परमोच्च वैभव प्राप्त होऊन भारत हा विश्व गुरु होईल – विवेक कुलकर्णी

बलिदान हिंदू समाज कदापि विसरणार नाही. वारकऱ्यांनी धर्मासाठी बोलले तर त्यांना लवांडे सारखे घुसखोर म्हणतात.ज्यांना वारकरी संप्रदाय कळालाच नाही,जे लोक एकादशीला मटन खातात.त्यांनी वारकऱ्यांना घुसखोर म्हणण्याची लायकीच नाही.वारकरी संप्रदायामुळेच देशातील तरुण व्यसनमुक्त व देशातील शेतकरी आत्महत्या करण्यापासून परावृत्त होत आहेत. वारकरी संप्रदायाचे देशाच्या व राष्ट्राच्या प्रगतीत मोठे योगदान आहे.वारकरी संप्रदायावर केलेली टीका हा हिंदू समाज कधीच खपवून घेणार नाहीत.

सर्वेश मेहंदळे म्हणाले,लव जिहाद व लँड जिहाद ही समस्या संपूर्ण देशात मोठ्या प्रमाणात वाढत आहे. वक्फ बोर्डाने मढी देवस्थान ट्रस्टची २०० ते २५० एकर जमिनीवर दावा दाखल केला आहे.तसेच नाशिकच्या कार्पोरेट क्षेत्रात उच्चभ्रू ठिकाणी नोकरी करत असलेल्या महिलांना लव जिहाद घ्या जाळ्यात ओढले जाते. आता हिंदू समाजाने जागृत होणे गरजेचे आहे.लव जिहाद व लँड जिहाद थांबवायचा असेल तर यासाठी कायद्यात आवश्यकते बदल करणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने समाजात परिवर्तन घडवण्यासाठी पंचपरिवर्तन हा कार्यक्रम हाती घेतला आहे.सामाजिक समरसता–जातीभेद, अस्पृश्यता नष्ट करणे.सर्व हिंदू समाज एक आहे ही भावना. सहभोजन, समरसता यात्रांचे आयोजन. कुटुंब प्रबोधन–भारतीय कुटुंब व्यवस्थेचे जतन.माता–पित्यांचा आदर,संस्कार,एकत्र कुटुंब, पर्यावरण–जलसंधारण,वृक्षारोण, प्लास्टिक मुक्ती,नदी स्वच्छता.एक पेड़ देश के नामअभियान. पाणी वाचवा.स्वबोध–स्वदेशी आचरण,स्वदेशी वस्तूंचा वापर,भारतीय भाषांचा आदर.नागरिक कर्तव्य–वाहतूक नियम पाळणे,कर भरणे,मतदान करणे,सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे.२०२५ हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष असल्याने पंचपरिवर्तनावर विशेष भर दिला आहे. विराट हिंदू संमेलनासाठी भिंगार,नागरदेवळे येथील हिंदू समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.विराट हिंदू संमेलनाचा समारोप वंदे मातरम या गीताने करण्यात आला.